महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email :ciro@mahadiscom.inwebsite : www.mahadiscom.inदूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U40109MH2005SGC153645

**जा. क्र. औसंवि/ब/जीवनविमा /००२५७३** **दिनांक : ०२.०२.२०२२**

# परिपत्रक

**विषय:** महावितरण व म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कंपनी मर्या. या कंपनीमधील दि.०७.१०.२०२१ या तारखेपासून मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसांना कंपनीमार्फत गट मुदत जीवन विमा योजनेची रक्कम रु. २० लाख अदा करणेबाबत.

*****

म.रा.वि.मं. सुत्रधारी कं. मर्यादित अंतर्गत महावितरण, महानिर्मिती व महापारेषण कंपनी मधील अपघाती अथवा नैसर्गिक मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना रु.२० लाख रक्कमेची **गट मुदत जीवन विमा योजना** (**Group Term Insurance Policy**) वेतन पुर्ननिर्धारण करारातील मुद्दा क्र.१० मधील (१०.२) नुसार लागू करण्याबाबतचा करार दि.११.०९.२०१९ रोजी करण्यात आलेला होता. त्यानुषंगाने दि.०७.१०.२०२० ते दि.०६.१०.२०२१ या कालावधी करीता M/S India First Life Insurance Company Ltd. यांच्यामार्फत "गट मुदत जीवन विमा योजना" (**Group Term Insurance Policy**) पासून लागू करण्यात आली होती. त्यानूसार परिपत्रक क्र.१६८८९, दि.१४.१०.२०२० निर्गमित करण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे यापूर्वी दि.११.०९.२०१९ ते दि.०६.१०.२०२० या कालावधीतील मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना देखील सदर विमा योजनेची रक्कम रु.२० लाख या विभागाचे परिपत्रक क्र.औसंवि/ब/जीवनविमा/१२८३७, दि.१०.०६.२०२१ अन्वये कंपनीमार्फत अदा करण्याच्या सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. तसेच सदर योजना ही दि. ०६.१०.२०२१ रोजी ००:०० वाजता संपुष्टात आल्यामुळे दि.०७.१०.२०२१ या तारखेपासून अपघाती अथवा नैसर्गिक मृत्यू व कोव्हिड-१९ या विषाणूच्या प्रार्दुभावामुळे मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना देखील त्यांचा हक्क मिळावा व सदर योजना पुढे कार्यान्वित होईपर्यंत कोणीही सदर योजनेपासून वंचित राहू नये ही बाब प्रशासनाच्या विचाराधीन होती.

३. त्यानुसार, मा. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कंपनी मर्या., यांनी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, महानिर्मिती व महापारेषण तसेच संचालक (वित्त), म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कंपनी मर्या., यांच्याशी विचारविनिमय करुन दि.०७.१०.२०२१ ते विमा योजना कार्यान्वित होण्याच्या तारखेपर्यंत मयत झालेल्या कर्मचाऱ्याच्या वारसांना रक्कम रु.२० लाख कंपनीमार्फत अदा करण्याची मंजूरी दिली आहे.

४. **महावितरण व म.रा.वि.मंडळ सुत्रधारी कंपनी मर्या. या कंपनीमधील दि.०७.१०.२०२१ पासून मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना रु.२० लाख ही रक्कम गट मुदत जीवन विमा योजनेचा लाभ म्हणून कंपनीमार्फत तातडीने अदा करावी. सदर योजनेचा लाभ देण्याकरीता संबंधीत कार्यालयाने मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांकडून खालील आवश्यक कागदपत्रे मागवून परीपूर्ण प्रस्ताव त्वरित संबंधीत मुख्य अभियंता, परिमंडळ कार्यालयाकडे सादर करावा.**

❖ ***प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे***

**१. कर्मचाऱ्याचा मृत्यु दाखला. (Copy of Employee Death Certificate)**
**२. कर्मचाऱ्याच्या वारसाचे आधारकार्ड व पॅन कार्ड. (Aadhar Card & Pan Card of Nominee)**
**३. वारसाच्या बँक खात्याचा रद्द केलेला धनादेश अथवा बँक पासबुकची छायांकीत प्रत. (Copy of Bank pass- book & cancelled Cheque of Nominee.) .**

५. **दि. ०७.१०.२०२१ पासून सदर गट मुदत जीवन विमा योजना विमा कंपनीमार्फत कार्यान्वित होईपर्यंत मयत झालेल्या कर्मचाऱ्यांना रु. २० लाख कंपनीमार्फत मंजुर करण्याचे अधिकार क्षेत्रीय कार्यालयाकरीता परिमंडळाचे मुख्य अभियंता व सांघिक कार्यालयाचे स्तरावर संबंधित विभाग प्रमुख यांना देण्यात आलेले आहेत.**

सबब, सदर कालावधीमधील मयत कर्मचाऱ्यांचे वारसांना सदर गट मुदत जीवन विमा योजनेच्या लाभाची रक्कम तातडीने कंपनीमार्फत अदा करुन सर्व प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत.

सदरचे परिपत्रक महावितरण कंपनीच्या E-Library व Employee Portal वरील Circular (I.R.Department) येथे उपलब्ध असून त्यांची मुद्रांकीत प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

(अरविंद भादिकर)
**कार्यकारी संचालक (मासं)**

D:\old pc data bacup\D\old d drive\madhuri\A.T.Kadam new\PARIPELLI\After Group Term Insurance Policy Circular dt 02.02.2022 .docx